23 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी विजेते

## शिवाजी विद्यापीठात ‘आविष्कार’ संशोधन स्पर्धा : १९३ संशोधक स्पर्धकांचा सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठातील दोन दिवसीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये आज कासेगाव येथील राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतेपद पटकावले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यार्थी विकास विभाग आणि रसायनशास्त्र अधिविभागातर्फे महोत्सवाचे संयोजन करण्यात आले. त्यात शनिवारी झालेल्या पदव्युत्तर गटातील स्पर्धेमध्ये १९३ संशोधक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचा निकाल गटनिहाय अनुक्रमे असा आहे. मानव्यशास्त्र, भाषा व ललित कला : साक्षी दलाल (औद्योगिक रसायनशास्त्र), सुशांत पाटील (संख्याशास्त्र अधिविभाग), अनुष्का कारंडे (राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), प्रियांका ढेबे (किसन वीर महाविद्यालय, वाई), मुकेश हक्के (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क, जकातवाडी). वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा : आदित्य करगे (डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव), साक्षी शेडगे (लालबहादूर शास्त्री कॉलेज, सातारा), भार्गवी कुंभार (कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पलूस), वैष्णवी पाटील (श्री शिव शाहू महाविद्यालय, सरुड), महेश मोरे (संख्याशास्त्र अधिविभाग विद्यापीठ).

शुद्ध विज्ञान : ओंकार सुतार (विवेकानंद महाविद्यालय), सुषमा देशमुख (जैवतंत्रज्ञान अधिविभाग), राजशेखर यादव (औद्योगिक रसायनशास्त्र विद्यापीठ), स्वप्नील पाटील (यशवंतराव चव्हाण विज्ञान महाविद्यालय, कऱ्हाड), नंदिनी ढोबळे (गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कऱ्हाड). कृषी आणि पशु विज्ञान : गजानन देशमाने (आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली), तनुजा कदम (डॉ. शिवाजीराव कदम फार्मसी महाविद्यालय, कसबे डिग्रज), ज्ञानेश्वर माने (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर), सत्यम पाटील (एस. जी. एम. कॉलेज, कऱ्हाड), ओंकार पाटील (जैवतंत्रज्ञान अधिविभाग विद्यापीठ).

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान : शौनक बेले (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगाव), ऐश्वर्या सास्ते, काजल अत्रि (सायबर, कोल्हापूर), क्रांती देशमुख (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी), प्रीती कोचाळे (किसन वीर महाविद्यालय). वैद्यकीय आणि औषध निर्माण : सेजल खटकी (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी), प्रसाद कोळी (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी), आकांक्षा मोरे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी), पूजा पुजारी (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी), मानसी जाधव (शिवाजी विद्यापीठ). ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. डी. एच. दगडे, दत्तप्रसाद पोरे, डॉ. एस. भोगे, एस. एन. तायडे आदींनी परिश्रम घेतले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये रविवारी कासेगाव येथील राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसीच्या विजेत्या विद्यार्थ्यांना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. कैलास सोनवणे, तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
23 DEC 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजारामबापू फार्मसीला विजेतपद

## आविष्कार संशोधन स्पर्धा : पदव्युत्तर गटातील निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पार पडलेल्या दोनदिवसीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये रविवारी कासेगाव येथील राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतपद पटकावले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि रसायनशास्त्र अधिविभागातर्फे जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेच्या फेऱ्यांनंतर विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पार पडला. पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. संशोधन अशा तीन गटांमध्ये संशोधकांनी या दोन दिवसांत आपले प्रकल्प पोस्टर आणि मॉडेल्सच्या स्वरूपात सादर केले. मानव्यशास्त्र, भाषा आणि कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान तसेच वैद्यकीय आणि औषधनिर्माण या सहा श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. पदव्युत्तर गटातील स्पर्धेत १९३ संशोधक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, केंद्रीय समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, समन्वयक डॉ. दत्तप्रसाद पोरे, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. एस. एन. तायडे यांनी परिश्रम घेतले.




शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात रविवारी आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये कासेगाव येथील राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसीने प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते चषक स्वीकारले.

### पदव्युत्तर गटातील निकाल पुढीलप्रमाणे :

- मानव्यशास्त्र, भाषा व ललित कला : १. साक्षी दाताळ, २. सुशांत पाटील, ३. अनुष्का कारंडे, ४. प्रियांका ढेबे, मुकेश हक्के.
- वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा : १. आदित्य बरगे, २. साक्षी शेडगे, ३. भार्गवी कुंभार, ४. वैष्णवी पाटील, ५. महेश मोरे.
- शुद्ध विज्ञान : १. ओंकार सुतार, २. सुषमा देशमुख, ३. राजशेखर यादव, ४. स्वप्निल पाटील, नंदिनी डोळसे.
- कृषी आणि पशुविज्ञान : १. गजानन देशमाने, २. तनुजा कदम, ३. ज्ञानेश्वर माने, ४. सत्यम पाटील, ५. ओंकार पाटील.
- अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान : १. शौनक बेले, २. ऐश्वर्या सास्ते, ३. काजल अत्रि, ४. क्रांती देशमुख, प्रीती कोचाळे.
- वैद्यकीय आणि औषध निर्माण : १. सेजल खटकी, २. प्रसाद कोळी, ३. आकांक्षा मोरे, ४. पूजा पुजारी, ५. मानसी जाधव.

जनसंपर्क कक्ष
23 DEC 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आविष्कार'मध्ये राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी विजेते



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पार पडलेल्या दोनदिवसीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये रविवारी कासेगाव येथील राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतपद पटकावले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे उद्दिष्ट बाळगून दरवर्षी आविष्कार संशोधन महोत्सव आयोजित करण्यात येतो. जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेच्या फेऱ्यांनंतर विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पार पडला. विद्यार्थी विकास विभाग आणि रसायनशास्त्र अधिविभागातर्फे महोत्सवाचे संयोजन करण्यात आले. पदवीस्तरीय, पदव्युत्तरस्तरीय आणि पीएच.डी. संशोधनस्तरीय अशा तीन गटांमध्ये संशोधकांनी या दोन दिवसांत आपले प्रकल्प पोस्टर व मॉडेल्सच्या स्वरूपात सादर केले. सहा श्रेणींमध्ये संशोधक विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादरीकरण केले. शनिवारी झालेल्या पदव्युत्तर गटातील स्पर्धेमध्ये १९३ संशोधक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. कैलास सोनवणे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. डी. एच. दगडे, डॉ. दत्तप्रसाद पोरे, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. एस. एन. तायडे यांच्यासह रसायनशास्त्र अधिविभागातील सर्वच शिक्षक, प्रशासकीय सेवक यांनी परिश्रम घेतले.

23 DEC 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : आविष्कार संशोधन स्पर्धेतील सादरीकरण पाहण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात दोन्ही दिवस विद्यार्थ्यांची मोठी गदी होती.

# 'आविष्कार'मध्ये राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी विजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात झालेल्या आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये कासेगाव येथील राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसीने विजेतपद पटकावले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पार पडला. विद्यार्थी विकास विभाग आणि रसायनशास्त्र अधिविभागातर्फे महोत्सवाचे संयोजन करण्यात आले. पदवीस्तरीय, पदव्युत्तरस्तरीय आणि पीएच.डी. संशोधनस्तरीय अशा तीन गटांमध्ये संशोधकांनी या दोन दिवसांत आपले प्रकल्प पोस्टर व मॉडेल्सच्या स्वरूपात सादर केले. शनिवारी झालेल्या पदव्युत्तर गटातील स्पर्धेमध्ये १९३ संशोधक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. त्यांचा गटनिहाय निकाल जाहीर करण्यात आला आहे.

यात मानव्यशास्त्र, भाषा व ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी आणि पशुविज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, वैद्यकीय आणि औषध निर्माण शाखांचा समावेश आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, केंद्रीय समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, स्पर्धा समन्वयक डॉ. दत्तप्रसाद पोरे, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. एस. एन. तायडे यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2024
पुढारी

# पदव्युत्तर संशोधकांकडून १९१ प्रकल्पांचे सादरीकरण

## विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवामध्ये पदव्युत्तर स्तरीय संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संशोधन प्रकल्पांचे पोस्टर व मॉडेल्सद्वारे सादरीकरण केले. १९१ संशोधकांनी सहभाग नोंदविला.

जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेच्या फेऱ्यांनंतर विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पार पडला. रसायनशास्त्र अधिविभागातर्फे महोत्सवाचे संयोजन करण्यात आले. पहिल्या तीन विजेत्या प्रकल्पांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहे.

**पदवीस्तरीय स्पर्धा : मानव्यशास्त्र, भाषा आणि कला** :- प्रीती भिसे, श्रुती माने, अवंती पाटील, सानिया मुजावर, इंद्रायणी महाजन. **वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा** :- शर्वरी पिसाळ, शर्वरी गुरव, सानिया सूर्यवंशी, रामकृष्ण सावंत, रसिका गायकवाड. **शुद्ध विज्ञान** :- संचिता श्रीनिवास, प्रतीक्षा भुजबळ, अनुराधा बोरनाईक, नुपूर काळे, साक्षी शिंदे. **कृषी आणि पशुसंवर्धन** :- विघ्नेश पाटील, ताहीर मुल्ला, रितीका कोंडुसकर, जान्हवी पानसरे, यश पाटील.

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान** :- दीक्षा घोईसावरवाडे, प्राची लोकरे, श्रुती पाटील, निखिल पाटील, पद्मावती घाडगे. **वैद्यकीय आणि औषधनिर्माण** :- श्रुती किल्लेदार, वैष्णवी सावंत, ऋषीकेश पाटील, स्वप्निल माने. **पीएच.डी. संशोधनस्तरीय स्पर्धा** : मानव्यशास्त्र, भाषा आणि कला:- नीलम कांबळे, किरण चौगुले, सुनील बुद्धनवार.

23 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रथमच संगणक प्रणालीद्वारे उत्तरपत्रिका तपासणी

## एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी.च्या १५ ते २० लाख उत्तरपत्रिका तपासल्या जाणार : शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून पहिलाच प्रयत्न

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी (Digital Evaluation system) या संगणकीय प्रणालीव्दारे होणार आहे. राज्यातील काही मोजक्या विद्यापीठांमध्ये ही पध्दत वापरली जाते. आता विद्यापीठातील पदव्युत्तरच्या एम. ए., एम. कॉम आणि एम. एस्सी.च्या ३४ अभ्यासक्रमाच्या २ लाख ५० हजारहून अधिक विद्यार्थ्यांच्या १५ ते २० लाख उत्तरपत्रिका संगणक प्रणालीव्दारे तपासल्या जाणार आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर उर्वरित अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची संगणकीय तपासणी करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

संगणकीय प्रणालीद्वारे काही निवडक पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका तपासल्या जाणार आहेत. भविष्यात उर्वरित पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी ही पध्दत वापरली जाणार आहे. सध्या पारंपरिक पध्दतीने उत्तरपत्रिकांची तपासणी होते. कमी



मनुष्यबळ अन येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठीच विद्यापीठाने संगणक प्रणालीव्दारे उत्तरपत्रिका तपासणीचा निर्णय घेतला आहे. येथे प्राध्यापकाकडून एखादा प्रश्न तपासायचा राहिला किंवा तपासलेल्या प्रश्नांचे गुण द्यायचे राहिले तर संगणक तत्काळ सूचना देईल, तसेच संगणकाच्या माध्यमातून बिनचूक निकाल जाहीर करण्यास मदत होईल, असा दावा शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने केला आहे.

संगणक प्रणालीमध्ये उत्तरपत्रिका स्कॅन करून त्याचे रूपांतर पीडीएफमध्ये केले जाईल. त्यानंतर पीडीएफ उत्तरपत्रिकेला एक सांकेतिक क्रमांक देऊन ती संबंधित विषयांच्या फोल्डरमध्ये समाविष्ट केल्यावर

### गोपनियता व निकाल कमी वेळेत जाहीर होणार

ओएसएम या संगणक प्रणालीमुळे मूल्यमापन पद्धतीमध्ये गतिमानता, अचुकता, गोपनीयता राखण्यासाठी मदत होईल. सर्व परीक्षांचे निकाल कमीत कमी वेळेमध्ये जाहीर होण्यास मदत होईल. त्याचबरोबर फोटो कॉपी, पुनर्मुल्यांकन व फेरतपासणी प्रक्रिया कमी कालावधीत पूर्ण करता येईल. याचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना निश्चित होईल.

-डॉ. अजितसिंह जाधव (संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ)

संगणक प्रणालीमध्ये जाईल. प्रणालीमध्ये प्रश्न पत्रिकेचे स्वरूप, आदर्श उत्तरपत्रिका, गुणदान पध्दत, परीक्षकाचे विषय निश्चित केलेले असतील. त्यामुळे परीक्षकांना त्यांच्या विषयांच्या उत्तरपत्रिका त्यांच्या लॉगईनमध्ये उपलब्ध होतील. संबंधित परीक्षकाने लॉगईन केल्यानंतर त्यांच्या विषयांमधील ज्या विषयाच्या उत्तरपत्रिका तपासायच्या आहेत, ती विषय निवडल्यानंतर संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध असणाऱ्या एकूण उत्तरपत्रिकांपैकी रँडम पध्दतीने एक उत्तरपत्रिका तपासण्यासाठी उपलब्ध होईल. त्या उत्तरपत्रिकेची तपासणी पूर्ण झाल्यानंतर दुसरी उत्तरपत्रिका उपलब्ध होईल. मूल्यमापन करताना परीक्षक या प्रणालीमध्ये उपलब्ध असणाऱ्या प्रश्नपत्रिका, आदर्श उत्तरपत्रिका, प्रश्ननिहाय गुणांचा वापर करू शकतात. परीक्षकांना उत्तरपत्रिकेत विद्यार्थ्यांनी लिहिलेले उत्तर वाचून गुण देण्याची सुविधा उपलब्ध आहे. अशा प्रकारे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तपासले जाईल. एखादा प्रश्न तपासयाचा राहिला असल्यास किंवा एखाद्या प्रश्नास गुण दिले नसल्यास उत्तरपत्रिका तपासून पूर्ण होणार नाही. या संगणकीय प्रणालीद्वारे निकाल जाहीर होईल. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून फोटोकॉपी अर्ज प्राप्त झाल्यानंतर कमी कालावधीत विद्यार्थ्यांच्या लॉगईनमध्ये फोटोकॉपी पाठवली जाईल. त्यामुळे पुनर्मुल्यांकन किंवा फेरतपासणी प्रक्रिया ही कमी वेळेत पूर्ण करून संबंधित विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करता येईल.

### संगणक प्रणालीचे फायदे

- मूल्यमापन विभागाकडून प्रत्येक परीक्षेसाठी मूल्यमापन केंद्र निश्चित व संबंधित केंद्रास आवश्यक कॅप संचालक व कर्मचाऱ्यांची नियुक्ती प्रक्रिया रद्द होईल
- प्रत्येक महाविद्यालय हे मूल्यमापन केंद्र म्हणून कार्यरत राहिल
- प्रत्येक शिक्षक हा त्यांच्या महाविद्यालय किंवा नजीकच्या महाविद्यालयात मूल्यमापन करु शकतो
- शिक्षकांच्या वेळेची व प्रवास खर्चाची बचत होईल
- मूल्यमापनात पारदर्शकता, गोपनीयता, अचूकता व गतिमानता येईल
- अधिकार मंडळाने मान्यताप्राप्त विषयनिहाय शिक्षकांना मूल्यमापन करणे अनिवार्य राहिल
- उत्तरपत्रिका तपासणी व गुणांच्या बेरजेमधील त्रुटी राहणार नाहीत
- कोणत्या शिक्षकांनी किती उत्तरपत्रिका तपासल्या याची माहिती संबंधित अधिकारी व परीक्षा संचालकांना डॅशबोर्ड द्वारे समजेल
- फोटो कॉपी, पुनर्मूल्यांकन व फेरतपासणी प्रक्रिया गतिमान होईल

23 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सकारात्मकतेने नवीन शैक्षणिक धोरण यशस्वी करा

## शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : डॉ. सुनीलकुमार अमृतमहोत्सव समितीच्या वतीने आयोजित शिक्षण परिषदेत मार्गदर्शन करताना डॉ. व्ही. एन. शिंदे, सोबत सदानंद कदम, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. जी. पी. माळी, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रा. विनय पाटील आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरण सकारात्मक पध्दतीने राबविल्यास विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसतील. कौशल्याधिष्ठित शिक्षण हा या धोरणाचा आत्मा आहे. प्रत्येकाने सकारात्मकता दाखवून नवीन शैक्षणिक धोरण यशस्वी करा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. डॉ. सुनीलकुमार अमृतमहोत्सव समितीच्या वतीने आयोजित शिक्षण परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. न्यू कॉलेजमधील सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या विविध विषयावर चर्चा झाली.

डॉ. व्ही. एम. पाटील म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाचा बहुजन समाजाच्या विकासासाठी उपयोग होणार आहे. इतिहास संशोधक सदानंद कदम म्हणाले, सध्या भाषा व इतिहास बदलण्याचे काम सुरू आहे. व्हॉटसअॅपवरून राष्ट्रीय महापुरुषांची बदनामी केली जात आहे. विद्यार्थ्यांमधील कलागुण ओळखून त्यांच्यातील कौशल्य विकसित करण्याचे काम शिक्षकांनी केले पाहिजे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा मेंदू सक्षम असला पाहिजे. मेंदू सतत उत्क्रांत होत असल्याने विद्यार्थ्यांच्या मेंदूला सातत्याने कार्यरत ठेवले पाहिजे. प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली पाहिजे, असे सांगत दिवसभर परिषदेत झालेल्या व्याख्यानांचा आढावा घेतला.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची वैशिष्टे सांगितली. समितीचे अध्यक्ष डॉ. जी. पी. माळी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. विनय पाटील यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात डॉ. जे. के. पवार, मिलिंद यादव, शशिकला सरगर, डॉ. जी. पी. माळी यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. विश्वास सुतार, संजय कळके, प्रा. सी. एम. गायकवाड, अमेय जोशी, भाग्यश्री कासोटे, प्रा. टी. के. सरगर, प्राचार्य प्रभाकर हेरवाडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2024
पुढारी

# कौशल्याधिष्ठित शिक्षण नवीन शैक्षणिक धोरणाचा आत्मा : डॉ. व्ही. एन. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सकारात्मक पद्धतीने राबविल्यास विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसतील. कौशल्याधिष्ठित शिक्षण धोरणाचा आत्मा आहे. प्रत्येकाने सकारात्मकता दाखवून नवीन शैक्षणिक धोरण यशस्वी करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. डॉ. सुनीलकुमार लवटे अमृतमहोत्सव समितीच्या वतीने आयोजित शिक्षण परिषदेत ते बोलत होते. न्यू कॉलेजमधील सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील होते.

इतिहास संशोधक सदानंद कदम म्हणाले, सध्या भाषा व इतिहास बदलण्याचे काम सुरू आहे. सोशल मीडियाच्या जाळ्यातून नवीन पिढीला बाहेर काढले पाहिजे. डॉ. बी. एम. हिडेकर म्हणाले, अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा मेंदू सक्षम असला पाहिजे. मेंदू सतत उत्क्रांत होत असल्याने विद्यार्थ्यांच्या मेंदूला सातत्याने कार्यरत ठेवले पाहिजे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2024
तरुण भारत

# राष्ट्रीय गणित दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त २२ ते २८ डिसेंबर कालावधीत शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील व गणित अधिविभागातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, सेमिनार स्पर्धा होणार आहेत.

**▪ २८ रोजी शिक्षकांसाठी फॅकल्टी ट्रेनिंग प्रोग्रॅम : डॉ. सरिता ठाकुर यांची माहिती**

२३ डिसेंबर रोजी गणित अधिविभाग व महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान होईल. २८ डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांना गणित शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी गणित अधिविभागात फॅकल्टी ट्रेनिंग प्रोग्रॅम आयोजित केला आहे.

सर्व कार्यक्रम राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग तसेच एन.सी.एस.टी.सी., विज्ञान व तंत्रज्ञान विभाग यांच्या आर्थिक सहाय्याने होत आहेत, अशी माहिती गणित अधिविभागप्रमुख डॉ. सरिता ठकार यांनी दिली आहे.





कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठ परिसर रविवारी सकाळी धुक्याने असा व्यापला होता. २) विद्यापीठ परिसरात तलावातील पाण्यावर अशी धुक्याची चादर पसरली होती. ( छाया :नाज ट्रेनर)

# शहरात धुक्याची दुलई; तापमान १७.४ अंशांवर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गेल्या दोन दिवसांपासून कमी झालेली थंडीची तीव्रता रविवारी हलकी वाढली होती. शहरातील हुडहुडी कमी झाली असली, तरी आता पहाटे धुक्याची दुलई पाहायला मिळत आहे. रविवारी कोल्हापुरात दाट धुक्यात हरवले होते. दैनंदिन किमान तापमानात २.४ अंश सेल्सिअसची वाढ होऊन पारा १७.४ अंशांवर स्थिरावला होता.

शहरात पहाटे चार वाजल्यापासून धुक्याची दाट चादर पसरली होती. सुमारे साडेआठ वाजता सूर्यकिरणांनी धुक्यातून वाट काढली होती.

मॉर्निंग वॉकला जाणारे अनेकजण धुक्याचा आनंद घेत होते. काहीजण सेल्फी तसेच धुक्यात हरवलेल्या शहराचे फोटो घेत होते. शनिवारी १८.६ अंशांवर असणारे किमान तापमान रविवारी १७.४ अंशांवर आले होते; पण सापेक्ष आर्द्रता ९३ टक्क्यांपर्यंत वाढल्याने दुपारपासून सायंकाळपर्यंत उकाडा जाणवत होता.

मात्र, पहाटेच्या सुमारास पारा १५ अंशांपर्यंत घसरत असल्याने रात्री व पहाटे थंडीची तीव्रता कायम आहे. पुढील चार दिवस दि. २६ पर्यंत दुपारनंतर ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. यामुळे तापमान १८ ते १९ अंशांच्या घरात राहण्याची शक्यता असल्याने थंडीची तीव्रता कमी राहणार आहे.

आय विटनेस

# शिवाजी विद्यापीठ परिसरात धुक्याची दुलई....



शिवाजी विद्यापीठ परिसरातील इमारती, शिवाजी महाराजांचा पुतळा तसेच उद्यान परिसराने रविवारी पहाटे धुक्याची दुलई पांघरली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 DEC 2024
तरुण भारत

# दवबिंदूंचा अभिषेक...!



कोल्हापूर : रविवारी सकाळी संपूर्ण शहर दाट धुक्याची चादरीत हरवले. शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यावर जणू दवबिंदूंनी अभिषेकच केल्याचा भास होत होता. (छाया : रणजीत कणसे)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2024
पुढारी

# डॉ. विजय ककडे यांची सेबीमार्फत वित्तसाक्षरतेसाठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासन व अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. विजय ककडे यांची सेबीमार्फत वित्तसाक्षरतेसाठी तीन वर्षांसाठी राज्यस्तरीय निवड झाली आहे. आर्थिक नियोजन, गुंतवणुकीच्या संधी व फसव्या योजनांपासून सावधानता यासाठी गुंतवणूक जागरूकता अभियान सेबीमार्फत चालवले जाते. डॉ. ककडे यांनी गेल्या १० वर्षांपासून याप्रकारची ७०० हून अधिक व्याख्याने घेतली आहेत. विविध वृत्तपत्रांतून आर्थिक विषयावर त्यांचे लेखन सुरू आहे. अर्थशास्त्रातील क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ याचबरोबर राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध त्यांनी प्रकाशित केले आहेत. निवडीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले.

